अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 14 मे 2026 | वर्ष 11 वे | अंक 40 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# १०वीच्या निकालात हिंदू ज्ञान मंदिरचा स्वरीत तालुक्यात प्रथम

## नेवजाबाई हितकारिणी हायस्कुलचा सम्यक मेश्राम तालुक्यात दुसरा


स्वरीत चौधरी
९६.२० टक्के


सम्यक मेश्राम
९५.६० टक्के


वेदांत राऊत
९४.८० टक्के


सिमरन फुलझेले
९३.८० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.


महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता १० वीचा निकाल शुक्रवारी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर केला. 'पूर्व विदर्भाचे शिक्षणाचे माहेरघर' अशी ख्याती असलेल्या ब्रम्हपुरी नगरीने आपली ही ओळख पुन्हा एकदा सार्थ ठरविली आहे. ब्रम्हपुरी शहरातील विविध विद्यालयांनी यशाची परंपरा कायम राखत निकालात घवघवीत यश संपादन केले आहे. शहरातील हिंदू ज्ञान मंदिर या विद्यालयाचा विद्यार्थी स्वरीत दीपक चौधरी याने ९६.२० टक्के गुण मिळवून ब्रम्हपुरी तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावण्याचा बहुमान मिळवला आहे. त्याच्या या अतुलनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र असलेल्या नेवजाबाई हितकारिणी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनीही गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले आहे.नेवजाबाई हितकारिणी हायस्कूलचा विद्यार्थी सम्यक म. मेश्राम याने ९५.६० टक्के गुणांसह तालुक्यात दुसरा क्रमांक पटकाविला. वेदांत राऊत याने ९४.८० टक्के गुण मिळवून तालुक्यात तिसरे स्थान पटकाविले. नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी सिमरन मनीसागर फुलझेले हिने ९३.८० टक्के गुणांसह तालुक्यात चतुर्थ येण्याचा मान मिळवला. ब्रम्हपुरीतील या शैक्षणिक संस्थांनी केवळ उत्तम निकालच दिला नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान या निकालातून अधोरेखित झाले आहे. विशेषत:

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# राज्यात मद्यविक्री थंडावली, बियर मात्र जोरात

## विदेशी मद्यावर उत्पादन शुल्क वाढीचा परिणाम



ब्रम्हपुरी/का.प्र.

राज्य शासनाने देशी व विदेशी मद्याच्या उत्पादन शुल्कामध्ये तीन ते चारपट वाढ केल्याने मद्यप्रेमींनी आपला मोर्चा नव्याने बाजारात आलेल्या व स्वस्त असलेल्या महाराष्ट्र मद्य प्रकाराकडे आणि बीअरकडे वळवला आहे. परिणामी, संपलेल्या आर्थिक वर्षात राज्यातील बीअरच्या खपाने विक्रम प्रस्थापित केला असून बीअर हे राज्याचे पसंतीचे मद्य ठरले आहे.

युरोपमध्ये वाइन, पूर्वेकडील देशात बीअरला पसंती असली तरी भारतात मात्र देशी (सीएल) आणि 'भारतीय बनावटीचे विदेशी मद्य (आयएमएफएल) सर्वाधिक मागणी राहिलेली आहे. भारतात बीअरचा जो खप होतो तो किनारी भागातला प्रामुख्याने आहे. महाराष्ट्रात आजपर्यंत देशीचा पहिल्या क्रमांकावर खप राहिलेले आहे. मात्र, उत्पादन शुल्क विभागाने जूनमध्ये देशी आणि विदेशी मद्यावर मोठे उत्पादन शुल्क लादले, त्याचवेळी महाराष्ट्र बनावटीचे मद्य या नव्या श्रेणीच्या उत्पादनास परवाने दिले. देशी-विदेशी महाग झाल्याने मद्यप्रेमींनी महाराष्ट्र मद्य, बीअरकडे मोर्चा वळवला. वर्ष २०२५ मध्ये ३२ कोटी लिटर खप असलेले भारतीय बनावटीचे विदेशी मद्य यंदा २७ कोटी लिटरवर घसरले आहे. तुलनेत ३८ कोटी लिटर खप असलेली बीअर मात्र यंदा ४६ कोटी लिटरवर विक्रमी खपावर पोहोचली. उन्हाळ्यात बीअरचा खप ६ टक्क्यांनी वाढतो. पण, गेल्या ११ महिन्यात बीअरच्या खपाचे आकडे वाढतच गेले.

**उत्पादन शुल्क २९,९५७ कोटींवर :** वर्ष २०२५ मध्ये चार प्रकारच्या मद्यावरील उत्पादन शुल्कामधून राज्याला २५ हजार ४६७ कोटी रुपये मिळाले होते. उत्पादन शुल्काच्या महसुलात वार्षिक ८ टक्के वृद्धी होते. पण यंदा ही वाढ चक्क १८ टक्के झाली असून उत्पादन शुल्काचा आकडा २९ हजार ९५७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. राज्यात ११ बीअर उत्पादन घेणाऱ्या ब्रुअरी तर ३७ लघु ब्रुवरी आहेत. वाइन शॉपचे परवाने देणे बंद असले तरी बीअर शॉपीचे परवाने चालू आहेत. परिणामी, बीअर शॉपींची संख्या ५५८८ वर गेली. तीव्र बीअरमध्ये ८ तर सौम्य बीअरमध्ये ५ टक्के इतकी अल्कोहोलची मात्रा असते. त्यामुळे बीअरकडे मद्यप्रेमींचा वाढता कल दिलासा देणारी बाब मानली जात आहे.

**एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ विक्री**

देशी : ४२ कोटी ७० लाख लि.

विदेशी : २७ कोटी ४० लाख लि.

महाराष्ट्र मद्य श्रेणी : १ कोटी ८६ लाख लि.

वाईन : १ कोटी ३० लाख लि.

बीअर : ४६ कोटी १३ लाख लि.



संपादकीय...

## आर्थिक वास्तवाची कबुली!

देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी ऊर्जा बचत आणि आयात नियंत्रणाची गरज यात शंका नाही. तेल आणि सोने या दोन क्षेत्रांमुळे भारताच्या परकीय चलनावर प्रचंड दबाव येतो. विशेषतः सोन्याची आयात भारतीय अर्थव्यवस्थेसाठी कायमच डोकेदुखी ठरली आहे. भारतीय समाजात सोने हे केवळ दागिना नसून भावनिक, सांस्कृतिक आणि गुंतवणुकीचे प्रतीक मानले जाते. लग्न समारंभ, सण-उत्सव आणि सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे पाहिले जाते. त्यामुळे अचानक सोने खरेदी टाळण्याचे आवाहन जनतेला सहज स्वीकारणे कठीण आहे. तरीही जागतिक संकटाच्या काळात आर्थिक शिस्त आणि संयमाची गरज अधोरेखित करण्याचा प्रयत्न म्हणून या वक्तव्याकडे पाहता येईल.

सत्ताधारी पक्ष आणि समर्थकांनी या आवाहनाचे स्वागत करत त्याला राष्ट्रहिताशी जोडले. 'देशासाठी काही काळ त्याग करणे आवश्यक आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. परंतु, विरोधकांनी याच वक्तव्याला सरकारच्या आर्थिक अपयशाचे प्रमाणपत्र ठरवले. महागाई, वाढते इंधन दर, रुपयाची घसरण आणि परकीय चलन साठ्यावरचा ताण याबाबत सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. विरोधकांचा मुद्दा पूर्णपणे चुकीचा म्हणता येणार नाही. कारण गेल्या काही वर्षांत देशातील सामान्य नागरिकांवर महागाईचा ताण वाढलेला आहे. पेट्रोल-डिझेलचे दर कमी करण्यासाठी कररचनेत बदल करण्याऐवजी सरकारने जनतेला संयमाचे आवाहन करणे, हा विरोधकांच्या मते सोपा मार्ग आहे.

मात्र, या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. जागतिक संकटांचा भारतावर होणारा परिणाम हा वास्तव आहे. तेल उत्पादक देशांमध्ये अस्थिरता निर्माण झाली की त्याचा थेट परिणाम भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थांवर होतो. त्यामुळे ऊर्जा बचत आणि आयात कमी करण्यासाठी उपाययोजना करणे अपरिहार्य ठरते. पंतप्रधानांनी दिलेला संदेश हा त्याच दिशेने असलेला प्रयत्न म्हणून पाहायला हवा. मेट्रो, कारपूलिंग, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर किंवा वर्क फ्रॉम होम यांसारख्या संकल्पना केवळ इंधन बचतीपुरत्या मर्यादित नाहीत, तर भविष्यातील शाश्वत जीवनशैलीचाही भाग आहेत.

तथापि, सांगणे आणि वास्तवात त्याची अंमलबजावणी होणे यामध्ये मोठे अंतर असते. देशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अजूनही अनेक शहरांमध्ये अपुरी आहे. इलेक्ट्रिक वाहनांचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात नाहीत. ग्रामीण भागात तर सार्वजनिक वाहतुकीची परिस्थिती अत्यंत मर्यादित आहे. अशा परिस्थितीत लोकांनी खासगी वाहनांचा वापर कमी करावा, ही अपेक्षा व्यवहार्य ठरण्यासाठी सरकारलाच अधिक सक्षम पर्याय उपलब्ध करून द्यावे लागतील. इंधनावरील करांमध्ये सुसंगतता, इलेक्ट्रिक वाहनांसाठी प्रोत्साहन, चार्जिंग स्टेशनचे जाळे आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करणे या गोष्टींशिवाय केवळ आवाहनांमुळे अपेक्षित बदल घडणार नाही.

सोने खरेदीबाबतही अशीच परिस्थिती आहे. भारतीय समाजात सोने ही भावनिक आणि आर्थिक सुरक्षिततेची बाब मानली जाते. त्यामुळे पूर्णपणे सोने खरेदी टाळणे व्यवहार्य नाही. परंतु सोने पुनर्वापर, डिजिटल गोल्ड, गोल्ड बाँड्स यांसारख्या पर्यायांना प्रोत्साहन देणे शक्य आहे. सरकारने जनतेसमोर केवळ त्यागाची भाषा न करता व्यवहार्य पर्याय ठेवले पाहिजेत.

या संपूर्ण चर्चेत आणखी एक महत्त्वाची बाब समोर येते, ती म्हणजे राष्ट्रीय प्रश्नांवर राजकीय एकमताचा अभाव. सत्ताधारी पक्ष प्रत्येक टीकेकडे विरोध म्हणून पाहतो, तर विरोधक प्रत्येक आवाहनाकडे राजकीय संधी म्हणून पाहतात. अशा परिस्थितीत राष्ट्रीय हिताचे प्रश्न निवडणुकीच्या राजकारणात अडकतात. ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि आत्मनिर्भरता हे विषय पक्षीय राजकारणापलीकडे नेण्याची गरज आहे.

# ओबीसींचा स्वतंत्र रकाना नाही, तर जनगणना नाही

## ब्रम्हपुरीत महिला आघाडी आक्रमक, बहिष्काराचा इशारा

ब्रम्हपुरी/का.प्र.

'ज्याची जेवढी संख्या, त्याचा तेवढा वाटा' या लोकशाहीच्या सूत्राला बगल देऊन



२०२६ च्या जनगणनेत ओबीसी (OBC) प्रवर्गाची उपेक्षा केली जात असल्याचा आरोप करत, ब्रम्हपुरी येथील 'सकल ओबीसी महामोर्चा महिला आघाडी' च्या वतीने जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा तीव्र इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत देशाच्या प्रधानमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची गणना केली जात आहे. या प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १२ मध्ये घराचा प्रमुख कोणत्या समुदायाचा आहे, हे विचारले जात असताना त्यात केवळ सामान्य वर्ग (General), अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) असेच पर्याय देण्यात आले आहेत. देशातील ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या असलेल्या ओबीसी समाजाचा स्वतंत्र उल्लेख टाळल्याने समाजात तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'घराला जात नसते' असे संसदेत गृहमंत्र्यांनी म्हटले असताना, प्रत्यक्षात इतर प्रवर्गांची जात विचारली जात आहे; मग केवळ ओबीसींनाच 'इतर' (Others) मध्ये का ढकलले जात आहे? असा सवाल महिला आघाडीने उपस्थित केला आहे.

जात विचारल्याशिवाय अचूक समुदाय निश्चित होऊ शकत नाही, हे स्पष्ट असताना ओबीसींना डावलणे हा घटनात्मक अधिकारांवर गदा आणण्याचा प्रकार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ओबीसींच्या आरक्षणासाठी आणि शैक्षणिक-आर्थिक नियोजनासाठी 'इंपिरिकल डेटा' अत्यंत आवश्यक आहे. जर जनगणनेच्या पहिल्या ३३ प्रश्नांमध्येच ओबीसींची नोंद झाली नाही, तर भविष्यात अचूक आकडेवारी कशी उपलब्ध होणार? या चुकीमुळे पुढची पिढी संविधानिक हक्कांपासून वंचित राहण्याची भीती महिला पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. जनगणनेच्या प्रश्नावलीत तातडीने सुधारणा करून 'ओबीसी' साठी स्वतंत्र रकाना समाविष्ट करावा. २०२६ ची जनगणना पूर्णपणे 'जातिनिहाय' पद्धतीनेच व्हावी. ओबीसींची अधिकृत लोकसंख्या जाहीर करून त्यानुसार धोरणात्मक नियोजन करावे. अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. जोपर्यंत ओबीसींचा स्वतंत्र रकाना अर्जात समाविष्ट केला जात नाही, तोपर्यंत जनगणना २०२७ वर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा निर्णय सकल ओबीसी महामोर्चाने घेतला आहे.

केंद्र सरकारने या मागणीची दखल न घेतल्यास देशव्यापी आंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व सकल ओबीसी महामोर्चा महिला आघाडी, ब्रम्हपुरी च्या जयश्री कुथे, अल्का खोकले, वनिता ठाकूर, प्रतिभा भोयर, पिंकी राऊत, नयना आजबले, गीता ठाकरे, शितल नरूले, जया वंजारी, मंगला राऊत व इतर कार्यकर्त्यांनी केले आहे.

## विनोदिनी

नातवाने आपल्या आजोबांना विचारले... 'बायको' आणि 'गर्लफ्रेंड' यांच्यात काय फरक आहे? आजोबांनी तात्काळ सोप्या उदाहरणाद्वारे उत्तर दिले... बघ... बायको म्हणजे टीव्ही आणि गर्लफ्रेंड म्हणजे मोबाईल... टीव्ही आयुष्यभर (जवळजवळ) फुकट असतो, पण मोबाईलसाठी, जर तू पैसे दिले नाहीस, तर सेवा बंद केली जाते.

टीव्ही मोठा, अवजड आणि बहुतेक वेळा जुना असतो पण मोबाईल सुंदर, स्लिम, आकर्षक, बदलण्याजोगा आणि सहज घेऊन फिरण्याजोगा असतो. टीव्हीचा चालवण्याचा खर्च सहसा परवडण्यासारखा असतो,पण मोबाईलचा खर्च सहसा जास्त आणि मागण्या करणारा असतो. टीव्हीला रिमोट असतो, पण मोबाईलला नसतो.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मोबाईल हे दुहेरी संवादाचे माध्यम आहे (तू बोलतोस आणि ऐकतोस)पण टीव्हीच्या बाबतीत तुला फक्त ऐकावेच लागते (तुझी इच्छा असो वा नसो)! आणि शेवटचे पण महत्त्वाचे!!!

तरीही टीव्हीच श्रेष्ठ आहेत कारण टीव्हीमध्ये व्हायरस नसतात, पण मोबाईलमध्ये बहुतेक वेळा असतात ?? आणि मोबाईल सहज हॅक किंवा चोरले जाऊ शकतात. त्यामुळे भविष्यात काळजीपूर्वक दोघींनाही वापरावं लागेल...काळजी घे...

## आकाश विद्यालय, मेंढाच्या विद्यार्थ्यांचे यश

नागभीड/प्रतिनिधी

तालुक्यातील आकाश विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय मेंढा ख. येथील विद्यार्थिनी कु. दिव्या गणेश मेश्राम हिने ६४.४०% गुण प्राप्त करून विद्यालयातुन प्रथम तर कु. सानिया राजेंद्र लडके हिने ६३.४०% गुण मिळवून विद्यालयातून द्वितीय तर कु. ऋतुजा प्रकाश तोंडासे ६१.२०% गुण घेऊन विद्यालयातून तृतीय येण्याचा बहुमान पटकाविला तर, चतुर्थ कु. प्रिन्सी प्रणशील बनकर ६१% गुण प्राप्त केले.

याबद्दल त्यांच्या घरी जाऊन पालकांसह सत्कार करण्यात आला. ह्याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापिका कु. गोहने मॅडम, डॉ. प्रा. जगनाळे मॅडम, प्रा. भांडारकर मॅडम, कु. कुंभलवार मॅडम, प्रा. पारधी सर, परशुरामकर सर, कोहाडे सर, गडपायले सर, मेश्राम सर, आकाश विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय मेंढा. येथील शिक्षक वृंद उपस्थित होते.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे एसएससी परीक्षेत घवघवीत यश


सम्यक म. मेश्राम
९५.६० टक्के


वेदांत वि. राजत
९४.८० टक्के


गौरव रा. शेन्डे
९२.४० टक्के


मुन्ना हो. वकेकार
९२.०० टक्के


संस्कार व. कामडी
९२.०० टक्के


साईनाथ भा. आत्राम
९०.२० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथील विद्यार्थ्यांनी एस.एस.सी. परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८७.५४ टक्के लागला असून गुणवंत विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यालयातून सम्यक म. मेश्राम याने ९५.६० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच वेदांत वि. राजत (९४.८०%), गौरव रा. शेंडे (९२.४०%), मुन्ना हो. वकेकार (९२.००%), संस्कार व. कामडी (९२.००%) आणि साईनाथ भा. आत्राम (९०.२०%) यांनीही उत्कृष्ट यश संपादन केले. याशिवाय अभिजीत क्री. किरमिरे (८९.४०%), तेजस स. माकडे (८७.६०%), तुषांत चं. बुराडे (८६.००%), उत्तम न. चौधरी (८५.८०%), समीर भा. बावणे (८५.६०%), चैतन्य गु. वरंबे (८५.२०%) तसेच मराठी माध्यमातून अथर्व पिं. ठाकरे (६७.८०%) यांनी यश मिळवून विद्यालयाचा गौरव वाढविला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव अशोकजी भैया तथा पदाधिकारी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षणसंस्था,ब्रम्हपुरी यांचेसह के. एम. नाईक मुख्याध्यापक , ए. डब्ल्यू. नाकाडे उपमुख्याध्यापक, पी. आर. जिभकाटे पर्यवेक्षक, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ख्रिस्तानंदची आयुषी वासनिक व अन्वया बावणकुळे ९३.६० टक्के गुण घेत संयुक्तपणे विद्यालयातून अव्वल


आयुषी न. वासनिक
९३.६० टक्के


अन्वया म. बावणकुळे
९३.६० टक्के


मुग्धा दे. सहारे
९२.४० टक्के


आफिया मो. पंजवानी
९२.२० टक्के


प्राप्ती के. लोहंबरे
९२.०० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत मार्च २०२६ ला घेण्यात आलेल्या दहाविच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून स्थानिक ख्रिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज ची आयुषी नरेंद्र वासनिक व अन्वया मनोज बावनकुळे हया दोघींनी ९३.६० टक्के गुण घेऊन विद्यालयातून संयुक्तपणे प्रथम येण्याचा मान मिळविला.

तर मुग्धा देवराव सहारे हिने ९२.४० टक्के गुण घेऊन द्वितीय तर आफिया बानू मोहह. पंजवानी हिने ९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान मिळविला. विद्यालयाचा ९९.३२ टक्के निकाल लागलेला असून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्कृष्ठ निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे. विद्यालयातील १४८ विद्यार्थ्यांनी दहाविची परीक्षा दिली होती. त्यामध्ये १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले आहे. तर ८० ते ९० टक्क्या दरम्यान ४६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. ख्रिस्तानंद स्कुल इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण देणारी परिसरातील सर्वात जुनी संस्था असून उच्च विद्याविभूषित शिक्षक, नियमित होणारे वर्ग, मुबलक शैक्षणिक सोईंची उपलब्धता यामुळेच दरवर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागत असतो.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर शिबू मोनीपल्ली, मुख्याध्यापक फादर बिनु थॉमस, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

**जल है तो कल है...**

## डॉ. आंबेडकर विद्यालयाचा ९०.२६ टक्के निकाल


दिक्षा वि. चौधरी
९०.६० टक्के


सृष्टी पु. मेश्राम
९०.०० टक्के


चंचल पु. कऱ्हाडे
८६.२० टक्के


सानिध्य ध. रामटेके
८६.२० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे अंतर्गत मार्च २०२६ ला घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून स्थानिक डॉ आंबेडकर विद्यालयातील कु. दिक्षा विजय चौधरी हिने ९०.६० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम स्थान मिळविले तर सृष्टी पुंडलिक मेश्राम हिने ९० टक्के गुण मिळवून द्वितीय स्थान मिळविले.

तसेच चंचल पुरुषोत्तम कऱ्हाडे ८६.२०, सानिध्य धर्मराज रामटेके ८६.२०, रिया सचिन गेडाम ८६.२०, आरुषी राजकुमार शेंडे ८२.८० तर किरण पितांबर ठवरे हिने ८२ टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रविण्य मिळविले. विद्यालयाचा एकूण ९० टक्के निकाल लागल्याने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उत्कृष्ठ निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.डब्यू. नन्नावरे, संस्थेचे सचिव डॉ देवेश कांबळे, अध्यक्ष डॉ राजेश कांबळे, संस्थेचे सदस्या रिमा कांबळे, डॉ. स्निग्धा कांबळे ,पर्यवेक्षिका कु.ए. बी. शेळके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

## महाराष्ट्र विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा

सुरज कामडी
८९.२०%





हिमानी मिसार
८८.४०%

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकतेच घोषित झालेल्या नागपूर बोर्डाच्या एसएससी मार्च - २६ च्या निकालात ब्रह्मपुरी तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ पिंपळगाव भोसले द्वारा संचालित महाराष्ट्र विद्यालयाने शाळेचा उत्कृष्ट निकाल देण्याची परंपरा कायम राखून यावर्षीही उत्कृष्ट ८० विद्यार्थ्यांपैकी ७५ पास झाल्यामुळे शाळेचा ९३ टक्के निकाल लागला.

या निकालात सुरज कामडी - ८९.२०% गुण प्राप्त करून विद्यालयातून पहिला, कु. हिमानी मिसार -८८.४० टक्के गुण प्राप्त करून दुसरी तर कु. हसीना ठाकरे – ८४.४० टक्के गुण प्राप्त करून तिसरी ठरली.

गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक, जास्तीत जास्त विद्यार्थी गुणवत्तेने पास होण्यासाठी शाळेच्या पहिल्या दिवसापासून तर परीक्षेच्या कालावधीपर्यंत धडपड करणारे शिक्षक सचिन कऱ्हाडे, महल्ले, पुरी, घ्यार, सडमाके व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व कौतुक करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच पिंपळगाव वाशीय प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक, गावकऱ्यांनी शाळेने उत्कृष्ट निकाल लावल्याबद्दल शाळेचे अभिनंदन केले.

# ने.हि. कन्या विद्यालयाचा निकाल ९३.९६ टक्के


सिमरन फुलझेले ९३.८० टक्के


आचल मिसार ९३.४० टक्के


युनिका शिलार ९२.२० टक्के


गुंजन देशमुख ९२.०० टक्के


प्रांजली शहारे ९१.८० टक्के


किर्ती विखार ९०.६० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रम्हपुरी येथील वर्ग दहावीच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाचा निकाल ९३.९६ टक्के लागलेला असून प्राविण्य श्रेणीमध्ये ७ विद्यार्थिनी, प्रथम श्रेणीमध्ये ३३ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे मनस्वी अभिनंदन होत आहे.

विद्यालयाने दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कु. सिमरन मुनीश्वर फुलझले हिने ९३.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक, कु. आचल शैलेश मिसार हिने ९३.४० टक्के गुण घेऊन विद्यालयातून द्वितीय क्रमांक, कु. युनिका विलास शिलार हिने ९२.२० टक्के गुण मिळवून शाळेतून तृतीय क्रमांक मिळवलेला आहे. तसेच मराठी माध्यमातून कु. लावण्या अनंता बोरघरे हिने ८३.२० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवलेला आहे.

संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताबाई भैय्या, उपाध्यक्ष प्रकाशजी भैय्या, सचिव अशोकजी भैया यांचेसह विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, शिक्षक- शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यालय परिवाराने सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व उज्वल भविष्यसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ने.हि. विद्यालय, नवेगांव पांडवचा एसएससी परीक्षेत उज्ज्वल निकाल

नागभिड/प्रतिनिधी

नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित नागभीड तालुक्यातील नवेगाव पांडव येथील नेवजाबाई हितकारिणी विद्यालयाने एस.एस.सी.-२०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८२.४७ टक्के लागला असून गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्यालयातील तेजस रू. निकुरे याने ८७.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तसेच धनश्री नन्नावरे हिने ८६.२० टक्के, कृतिका अ. भोपुलकर हिने ८४.२० टक्के, साक्षी गु. बोरकुटे हिने ८३.२० टक्के, राणी दे. गायधने हिने ८२.०० टक्के तर श्रुती भा. नन्नावरे हिने ८०.४० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयाच्या यशात भर घातली.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलताबाई भैया, उपाध्यक्ष प्रकाशजी भैया, सचिव अशोकजी भैया तसेच मुख्याध्यापक व्ही. सी. भैया यांनी, यशस्वी विद्यार्थी, शिक्षकवृंदाचे व पालकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लो.टि. विद्यालयाचा १० वीचा ८८.७० टक्के निकाल


विक्रम भाजीपाले ९०.०० टक्के


तृप्ती सहारे ८१.२० टक्के


श्रेयश मानापुरे ८१.०० टक्के


जानवी लोहंबरे ८०.२० टक्के


अमृता ठाकरे ७८.६० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच १० व्या वर्गाच्या घोषीत झालेल्या निकालामध्ये लोकमान्य टिळक माध्यमीक विदयालय,ब्रम्हपुरी चा निकाल ८८.७० टक्के लागला.

यात प्रथम क्रमांक विक्रम होमराज भाजीपाले (९० .००) टक्के , व्दितीय कु. तृप्ती मोरेश्वर सहारे (८१.२०) टक्के, तृतीय कु. श्रेयश प्रमोद मानापुरे (८१.००) टक्के , कु जानवी अनिल लोहंबरे (८०.२०) टक्के, कु अमृता किशोर ठाकरे (७८.६०), टक्के चतुर्थ व पाचवे स्थान मिळविले.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. अतुलभाऊ देशकर, सचीव सतीश .गो. शिनखेडे यांचेसह सर्व संचालक मंडळ, महाविदयालयाचे प्राचार्य विलास धोंगडे, उपप्राचार्य रवि पेशटटीवार, पर्यवेक्षिका प्राजक्ता चिंचाळकर, प्राध्यापक वर्ग, शिक्षक/शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विदयार्थ्यांचे अभीनंदन केले.

# धान उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ बोनस द्या

## गुरुदेव वाघरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

खरीप हंगाम अगदी तोंडावर असल्यामुळे शेतीच्या मशागतीची कामे सुरु असून पेरणीसाठी शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असून धान उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी तीस हजार बोनस देण्यात यावे, अशी मागणी तालुका काँग्रेस सरचिटणीस गुरुदेव वाघरे यांनी निवेदनातुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली आहे.

निवेदनात वाघरे यांनी म्हटले आहे की, धान उत्पादक शेतकरी हा नेहमीच अस्मानी व सुलतानी संकटात सापडलेला असतो. मागील खरीप हंगामात निसर्गाच्या अवकृपेमुळे धान उत्पादक शेतकरी हवालदील झाला होता. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात घट झाली होती. धान लागवडीसाठी लागणारा खर्चही निघालेला नाही. उत्पादन खर्चापेक्षा उत्पन्न कमी होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लावण्यासाठी व खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक हातभार अत्यंत आवश्यक असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ हेक्टरी तीस हजार बोनस वितरीत करावा अशी मागणी निवेदनातून उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांचे मार्फतीने केलेली आहे.

निवेदन देताना रूपेश बानबले आवळगाव, ज्ञानेश्वर झरकर संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, प्रितम बाबणवाडे प्रशासक आवळगांव, नरेश पाटिल राऊत हळदा, रामकृष्ण हुलके सामाजिक कार्यकर्ते बोडधा, राजू राऊत, संचित चुधरी युवा कार्यकर्ते मुडझा आदी उपस्थित होते.

# शरबत वाटप करून बाळासाहेब आंबेडकरांचा जन्मदिन साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

वंचित, शोषित, पिडीत, कष्टकरी, मजुर, शेतकरी यांची अविरत लढाई लढणारे आणि सर्व जाती धर्माच्या लोकांना वेगवेगळ्या लढ्यातून न्याय मिळवून देणारे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे वैचारिक वारसदार, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड बाळासाहेब आंबेडकर यांच्या १० मे रोजी झालेल्या जन्मदिना निमित्य स्वाभिमान दिवस म्हणून ब्रम्हपुरी येथे साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शरबत वाटप करून घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थित जनतेला बाळासाहेब आंबेडकर आणि वंचित बहुजन आघाडीची कार्यप्रणाली मार्गदर्शनातून विषद करण्यात आली. या कार्यक्रमाचे उदघाटक प्रेमरावजी लोखंडे, सहउदघाटक भिमरावजी बनकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा सचिव अरुणजी सुखदेवे, प्रमुख अतिथी तालुकाध्यक्ष लिलाधर वंजारी, भीमआर्मी चे तालुका प्रमुख प्रभुजी लोखंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष डि एम रामटेके यांनी केले तर उपस्थितांचे आभार पक्षाचे कार्यकर्ते सुरज मेश्राम यांनी मानले. यावेळी गणेश महाजन, विलास रामटेके, रवि मेश्राम, घनश्याम रामटेके, भारतीय बौद्ध महासभेचे सहारे साहेब तसेच कार्यकर्ते म्हणुन आर एन गायकवाड, रवि चहांदे, विहार मेश्राम, मनोज धनविज, मयुर चहांदे, सुनिल साळवे तथा असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# परमात्मा एक सहकारी पत संस्थेत मोठा आर्थिक घोटाळा!

## सहाय्यक निबंधक, पोलीस निरिक्षकांकडे तक्रार

**‘संस्थेचा कारभार अत्यंत पारदर्शक असणे अपेक्षित असताना, येथे नियम धाब्यावर बसवले जात आहेत. सामान्य नागरिकांचा घामाचा पैसा असुरक्षित आहे. जर वेळेत चौकशी झाली नाही, तर हा मोठा आर्थिक घोटाळा ठरू शकतो,’ असे मत तक्रारदार डॉ. विलास मैंद यांनी व्यक्त केले आहे.**

ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नामांकित समजल्या जाणाऱ्या ‘परमात्मा एक सहकारी पतसंस्थेत’ सध्या गंभीर अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराचे काळे ढग जमा झाले आहेत. संस्थेच्या उपनियमांना धाब्यावर बसवून करण्यात आलेले भरमसाठ कर्जवाटप आणि अपात्र व्यक्तींच्या महत्त्वाच्या पदांवरील नियुक्त्या यामुळे ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये धोक्यात आल्याची खळबळजनक तक्रार डॉ. विलास मैंद यांनी प्रशासनाकडे केली आहे. या प्रकरणामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

डॉ. विलास मैंद यांनी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) आणि पोलीस निरीक्षक, ब्रम्हपुरी यांना दिलेल्या पत्रात संस्थेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. तक्रारीतील मुख्य मुद्दे यात

**१)मर्यादेपेक्षा तिप्पट कर्जवाटप :** संस्थेची अधिकृत कर्ज मर्यादा केवळ १,५०,०००/- रुपये असताना, काही खास मर्जीतील व्यक्तींना चक्क ५,००,०००/- रुपयांपेक्षा अधिक कर्ज वाटप करण्यात आले आहे. हा प्रकार म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे सरळसरळ उल्लंघन असून यामुळे संस्था आर्थिकदृष्ट्या कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे.

**२) अपात्र ‘तज्ज्ञ’ संचालकांचा भरणा :** कायद्यानुसार तज्ज्ञ संचालकाकडे बँकिंग, वित्त किंवा लेखा क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असणे बंधनकारक आहे. मात्र, या संस्थेत केवळ १० वी/१२ वी शिक्षण असलेल्या आणि कोणताही अनुभव नसलेल्या व्यक्तींची 'तज्ज्ञ' म्हणून वर्णी लावण्यात आली आहे.

**३) नियमबाह्य वसुली अधिकारी :** दिनेश पिलारे यांची वसुली अधिकारी म्हणून केलेली नियुक्तीही वादाच्या भोऱ्यात सापडली आहे. संबंधित व्यक्तीकडे या कामासाठी लागणारी कोणतीही तांत्रिक अर्हता किंवा अनुभव नसल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

आता सर्वांचे लक्ष सहाय्यक निबंधक आणि पोलीस प्रशासनाकडे लागले आहे. संस्थेचे रेकॉर्ड जप्त करून लेखापरीक्षण (Audit) केल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यापूर्वी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार करूनही ठोस कारवाई न झाल्याने आता थेट पोलीस प्रशासनाचे दरवाजे ठोठावण्यात आले आहेत. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (BNS) आणि सहकारी संस्था अधिनियमांतर्गत गुन्हा नोंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्जवाटपातील अनियमिततेमुळे भविष्यात वसुली न झाल्यास संस्थेवर दिवाळखोरीची वेळ येऊ शकते. अशा परिस्थितीत ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळतील का? हा यक्षप्रश्न सध्या ब्रम्हपुरी परिसरात चर्चिला जात आहे.

❀❀❀❀❀❀

# कोर्धा येथील दोघांची गरूडझेप युवकांकरीता प्रेरणादायी

## माजी जि.प. सदस्य संजय गजपुरे यांचे तर्फे सत्कार



नागभीड/प्रतिनिधी

मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील युवक देखील मोठे यश संपादन करू शकतात हे नागभीड तालुक्यातील कोर्धा या छोट्याशा गावातील विवेक धनराज मशाखेत्री व कु. शितल मोहन जिवतोडे यांनी सिद्ध करून दाखविले आहे. या दोघांचाही सत्कार आमदार बंटीभाऊ भांगडिया यांच्या मार्गदर्शनात या क्षेत्राचे माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गजपुरे यांनी त्यांच्या घरी जाऊन केले.

विवेक मशाखेत्री यांची नुकतीच एसआरपीएफ गट क्रमांक १३, गडचिरोली येथे निवड झाली आहे. तर कु. शितल जिवतोडे हिची नागपुर शहर पोलीस दलात निवड झाली आहे.

याप्रसंगी दोघांनीही स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोर्धा येथे अभ्यासिकेचे बांधकाम करुन द्यावे, अशी आग्रही मागणी केली. याबाबत संजय गजपुरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आमदार बंटीभाऊ भांगडिया यांच्या माध्यमातुन यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी भाजपा चे ज्येष्ठ नेते वासुदेवराव जिवतोडे , गोंडवाना विद्यापीठाच्या सिनेट सदस्या किरणताई गजपुरे, उपसरपंच दिनेश चौधरी, शक्ती केंद्र प्रमुख विजय खोब्रागडे, तंटामुक्ती अध्यक्ष शंकर मशाखेत्री , ग्रामपंचायत चे रोजगार सेवक यशवंत निकुरे, बुथ प्रमुख श्रावण जिवतोडे, पत्रकार रामभाऊ चौधरी व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

### ... QUOTES ...

**“Make your life a masterpiece; imagine no limitations on what you can be, have or do.”**

**- Brian Tracy**

### चा रो ळी

*तुझ्या त्या हसण्याचा गडगडाट*
*अजून कानात घुमतो आहे...*
*तुला होकार दिला लग्नासाठी,*
*त्यानंतर मी हसणेच विसरलो आहे...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# डॉ. विलास मैंद यांचे आरोप बिनबुडाचे व खोटे

## स्वार्थ साध्य न झाल्याने संस्थेला बदनाम करण्याचा प्रयत्न

ब्रम्हपुरी /का.प्र.

ब्रम्हपुरी येथील ‘परमात्मा एक सेवक सहकारी पतसंस्थे’वर डॉ. विलास मैंद यांनी केलेले सर्व आरोप तथ्यहीन असून, संस्थेची प्रतिमा मलिन करण्यासाठी त्यांनी हा जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचे स्पष्टीकरण संस्थेच्या संचालक मंडळाने दिले आहे. संस्थेचा कारभार पारदर्शक आणि नियमानुसार सुरू असून, खोटे आरोप करणाऱ्या डॉ. मैंद यांच्यावर आता कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे अध्यक्ष दिलीप राऊत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

संस्थेने डॉ. मैंद यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्यावर सडेतोड उत्तर दिले आहे. यात **१) कर्ज मर्यादा नियमानुसारच :** डॉ. मैंद यांनी ५ लाखांच्या कर्जवाटपावर आक्षेप घेतला होता. मात्र, संस्थेने स्पष्ट केले की, परिपत्रकानुसार पतसंस्थेची वैयक्तिक महत्तम कर्ज मर्यादा ४० लाख रुपयांपर्यंत असू शकते. तरीही संस्थेने सुरक्षिततेसाठी ही मर्यादा ५ लाख रुपयांपर्यंतच मर्यादित ठेवली आहे. ४ कोटींच्या वर ठेवी असलेल्या संस्थेत ५ लाखांचे कर्जवाटप ही कोणतीही अनियमितता नसून कायदेशीर प्रक्रिया आहे.

**२) तज्ज्ञ संचालकांची नियुक्ती वैध :** तज्ज्ञ संचालक संतोषजी शेबे यांना 'माता कन्यका पतसंस्थे'चा संचालक पदाचा प्रदीर्घ अनुभव आहे, तर घनश्यामजी सूर्यवंशी यांना सामाजिक प्रतिष्ठा आणि संस्था स्थापनेतील योगदानामुळे 'स्वीकृत संचालक' म्हणून घेण्यात आले आहे. या नियुक्त्या पूर्णपणे अधिकृत आहेत.

**३) वसुली अधिकाऱ्याचा मुद्दा :** संस्थेमध्ये एन.पी.ए. (थकीत कर्ज) नसल्यामुळे कोणत्याही बाह्य वसुली अधिकाऱ्याची नियुक्ती केलेली नाही. केवळ संस्थेच्याच एका कर्मचाऱ्याकडे कर्ज विभागाचे कामकाज पाहण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

संचालक मंडळाने डॉ. विलास मैंद यांच्या राजीनाम्याचे खरे कारण समोर आणले आहे. डॉ. मैंद यांच्या इमारतीत संस्था सुरू होती. सुरुवातीला ५ हजार असलेले भाडे दुसऱ्या वर्षी ७,५०० रुपये करण्यात आले. तिसऱ्या वर्षी त्यांनी थेट १५,००० रुपये भाडे आणि १ लाख रुपये 'पगडी' मागितली. ही मागणी संस्थेला परवडणारी नसल्याने कार्यालय दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात आले. तसेच स्वत:ला 'संस्थापक' पद मिळावे यासाठी त्यांचा आग्रह होता, जो संचालक मंडळाने फेटाळून लावला होता. स्वत:च्या इमारतीचे भाडे वाढवून मिळाले नाही आणि मनमानी कारभार करता आला नाही, म्हणूनच डॉ. मैंद यांनी १९ जानेवारी २०२६ रोजी राजीनामा दिला. आता स्वत:चा स्वार्थ साध्य न झाल्यामुळे ते खोटे आरोप करून ठेवीदारांमध्ये भीती निर्माण करत आहेत, असा गंभीर आरोप संचालक मंडळाने केला आहे. कोणतीही शहानिशा न करता वृत्तपत्रात खोट्या बातम्या प्रसिद्ध करून संस्थेची बदनामी केल्याप्रकरणी डॉ. विलास मैंद यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. यावेळी अध्यक्ष दिलीप राऊत, उपाध्यक्ष गोविंदजी चट्टे, संचालक सुनील राखडे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# रा.स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्य भव्य नाट्यप्रयोगास ब्रम्हपुरीकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

ब्रम्हपुरी/का.प्र.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांच्या गौरवशाली प्रवासावर आधारित प्रेरणादायी नाट्यप्रयोगाला ब्रह्मपुरीतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सभागृह खचाखच भरून गेले. ब्रह्मपुरी अर्बन सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा भव्य नाट्यप्रयोग शनिवार, दि. ९ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता ने. हि. महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर विभाग संघचालक जयंतराव खरवडे, ज्येष्ठ प्रचारक रवींद्रजी भुसारी, विभाग कार्यवाह सुभाष इटणकर, ब्रह्मपुरी अर्बन बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर, उपाध्यक्ष रवींद्र अष्टेकर, संचालक दत्ताजी कात्यायन तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत श्रीवास्तव उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक परमपूजनीय डॉ. केशवराव बळीरामपंत हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक पूजनीय श्री गुरुजी (माधव सदाशिव गोळवलकर) तसेच तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या राष्ट्रकार्याचा प्रेरणादायी इतिहास या नाट्यप्रयोगातून जिवंत करण्यात आला. संघाच्या स्थापनेपासून ते समाजजीवनातील विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या कार्याचा प्रभावी आढावा कलाकारांनी रंगमंचावर साकारला.

नागपूर व पुणे येथील तब्बल ३० कलाकारांच्या सहभागामुळे नाट्यप्रयोग अधिक प्रभावी आणि आकर्षक ठरला. संवाद, संगीत, प्रकाशयोजना आणि नेपथ्य यांच्या उत्कृष्ट संगमामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विविध प्रसंगांना प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट मिळत होता. कार्यक्रमाचे संचालन अरविंद नंदुरकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय रवींद्र अष्टेकर यांनी करून दिला, तर प्रास्ताविक जयंत श्रीवास्तव यांनी केले. कार्यक्रमाला ब्रह्मपुरी शहर व परिसरातील नागरिक, युवक, महिला तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रभक्ती, सामाजिक समरसता आणि संघटनशक्तीचा संदेश देणारा हा नाट्यप्रयोग प्रेक्षकांच्या मनावर विशेष छाप पाडून गेला. ब्रह्मपुरी अर्बन सेवा प्रतिष्ठानच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. प्रवेश पूर्णतः मोफत असल्याने नागरिकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित नागरिकांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

# महा राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबीर

## कॉम्रेड विनोद झोडगे यांची प्रमुख उपस्थिती विविध प्रमाण पत्र वाटप

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील गांगलवाडी महसूल मंडळ द्वारा ब्रम्हपुरी तहसील कार्यालय च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान समाधान शिबिर टप्पा पहिला ‘महसुलाची वारी, शेतकऱ्यांच्या दारी’ यानुसार ग्रामपंचायत कार्यालय गांगलवाडी येथे दिनांक ९ मे रोजी आयोजित करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व स्त्री शिक्षणाची जनक सावित्री माई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून समाधान शिबीर सुरू करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी उत्पन्न



बाजार समिती चे सभापती प्रभाकर सेलोकर तर उद्घाटक नायब तहसीलदार प्रशांत धकाते प्रमुख अतिथी म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे लढाऊ नेते कॉम्रेड विनोद झोडगे पाटील, पंचायत समिती माजी सभापती प्रा रामलाल दोनाडकर, सरपंच विवेक बनकर, नायब तहसीलदार महानंदा मडावी, जयंत मडावी दुय्यम निबंधक, भूमी अभिलेख अधिकारी डाखोरे शिरस्पेदार, सहायक कृषी अधिकारी वैभव कडू, पत्रकार विनोद चौधरी, पोलिस पाटील नलेश भोयर, रणवीर ठाकरे, ग्राम पंचायत सदस्य संजय भोयर यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


समाधान शिबिर मध्ये विविध योजना विषयी मार्गदर्शन करून जनतेच्या समस्या जाणुन घेण्यात आल्या तसेच नागरिकांना विविध प्रकारचे प्रमाण पत्र वाटप करण्यात आले तसेच शिबिरात विविध महिला बचत गटांच्या माध्यमातून संसार उपयोगी प्रदर्शनी लावण्यात आली होती. समाधान शिबिर मध्ये गांगलवाडी महसूल मंडळातील अनेक गावातील नागरिक उपस्थित होते.


Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स





गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


# १०वीच्या निकालात हिंदु ज्ञान मंदिरचा...

(पान क्र. १ वरून)

नेवजाबाई हितकारिणी संस्थेच्या दोन्ही विद्यालयांनी (हायस्कूल व कन्या विद्यालय) आपल्या शिस्तबद्ध आणि दर्जेदार अध्यापन पद्धतीचा प्रत्यय दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा स्नेहलताबाई भैया व सचिव अशोक भैया यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. तसेच ने. हि. हायस्कूलचे मुख्याध्यापक के. एम. नाईक सर, उपमुख्याध्यापक नाकाडे सर, पी. आर. जिभकाटे पर्यवेक्षक तसेच ने. हि. कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रभा बनपुरकर मॅडम, व्ही. एम. निखारे उपमुख्याध्यापक, अर्चना खंडाते पर्यवेक्षिका आणि शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे फळ मिळाल्याची भावना व्यक्त केली.

# ट्रॅक्टरच्या जुन्या वादातून इसमावर हल्ला

ब्रह्मपुरी/का.प्र.

शेतातील ट्रॅक्टर नेण्याच्या कारणावरून दोघात झालेल्या मारहाणीत एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना ब्रह्मपुरी तालुक्यातील जबराबोडी (मेंढा) येथे सोमवारी दि. ११ उघडकीस आली. या वादातून एका तरुणावर लाकडी काठीने बेदम मारहाण करण्यात आली. यात तो गंभीर जखमी झाला. दीपक विठ्ठल नन्नावरे (३५) असे जखमीचे नाव आहे.

दीपक विठ्ठल नन्नावरे (३५) हे ८ मे रोजी सायंकाळच्या सुमारास सायकलने आपल्या घराकडे जात होते. ते ग्रामपंचायतीसमोरील रस्त्यावर पोहोचले असता, तिथे आधीच दबा धरून बसलेला आरोपी पुरुषोत्तम पंढरी पानसे याने त्यांना अडवले. जुन्या वादाची खुन्नस मनात धरून आरोपीने दीपक यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली आणि हातातील लाकडी काठीने त्यांच्यावर तुटून पडला.

आरोपीने दीपक यांच्या डोक्यावर, मानेवर, कमरेवर आणि पायावर सपासप वार केले. या हल्ल्यात दीपक गंभीर जखमी झाले. त्यांचे बंधू लोकेश नन्नावरे यांनी ग्रामस्थांच्या मदतीने त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हलवले.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404